**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६०/२०२५.**

**रेखाबाई वि. सुभाष व इतर.**

**नि.क्र.४.**

**<u>फिर्यादीचा कलम २२३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता प्रमाणे सत्यापण पडताळणीचा जबाब.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करतो की,</u>**

माझे नाव – रेखाबाई शामलाल चरावंडे,

वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – देऊळगाव बाजार, ता. सिल्लोड, जि.औरंगाबाद.

घटना २०२५ च्या उन्हाळ्यामध्ये सायंकाळी ०७.३० वाजेच्या दरम्याम देऊळगाव वाडी येथे माझ्या घरासमोर घडली होती. आम्ही सुभाष जरावंडे यांना दहा हजार रुपये दिले होते. मी त्यांना पैसे मागितले असता त्यांनी मला तोंडावर मारले. त्यावेळी तेथे माझा मुलगा शंकर चरावंडे, दोघे तिघे लोक हजर होते. तसेच आरोपी सुभाष चरावंडे, जादुसिंग चरावंडे, पवन चरावंडे, विशाल चरावंडे या चौघांनी मला लाथा बुक्यांनी मारहाण केली. तसेच, आरोपींनी जिवे मारण्याची धमकी दिली.त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो असता पोलिसांनी एन.सी. नोंदवली व मला न्यायालयात जाण्यास सांगितले होते. मला या व्यतिरिक्त अन्य काहीही सांगावयाचे नाही.

रेखा----------.

साक्षीदाराची स्वाक्षरी.

**समक्ष,**

13/2/26

**(ए. एच. तट्टु)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.३, सिल्लोड.

दिनांक – १३.०२.२०२६.